
मृदू भाव जागे होता...
सुहासिनी देशपांडे




# हे वाचलंत...?

'...रॉयननं मग हलकेच मेलेल्या कोब्राचं
छिन्नविच्छिन्न शरीर वल्ह्याच्या टोकावर उचललं
आणि विजयी वीराच्या दिमाखात चारही दिशांना मिरवून
दूर किनाऱ्याच्या झाडीत भिरकावून दिलं !
अवाक् झालेल्या सर्व प्रेक्षकांच्या मुखातून एकच
हर्षोत्फुल्ल जल्लोष सुरु झाला.
'' रॉयन ! रॉयन !...'' दूरवरच्या एका बोटीतून
सॅली मूकपणे आपल्या थोरल्या भावाकडे
कौतुकाने बघत होता.'

'...वेटिंग फॉर मिरॅकल्स' या वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटाचा
सुहासिनी देशपांडे यांनी केलेला हा स्वैर भावानुवाद.
लहानपणापासून परिस्थितीमुळे दूर राहिलेली ही दोन भावंडं
शिबिरात घडणाऱ्या वेगवेगळ्या प्रसंगांतून
एकमेकांच्या जवळ येतात.
त्यांच्यातलं हळूहळू फुलणारं नातं अनुभवूया
'कहाणी दोन भावांची' या पुस्तकातून.

# मृदू भाव जागे होता...

**कथासंग्रह**

**सुहासिनी देशपांडे**

‘छात्र प्रबोधन’
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.

**मृदू भाव जागे होता ... कथासंग्रह**
Mrudubhav Jage Hota .... Collection of Stories

**प्रकाशक - मुद्रक**
संपादक - 'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.

**संगणक अक्षरजुळणी**
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी,

**मुखपृष्ठ व चित्रे**
श्री. गिरीश सहस्रबुद्धे

**स्वामित्व**
सुहासिनी देशपांडे
३, पुण्यश्री अपार्टमेंट, रस्ता क्र. ७,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड,
पुणे - ४११ ०३८

**प्रथमावृत्ती** : सौर मार्गशीर्ष, शके १९२५,डिसेंबर २००३

**किंमत** : रुपये ३०/-

## अर्पणपत्रिका

चि. प्रमोद-प्रणव आणि चि. सौ. अवनी
यांना प्रेमपूर्वक......

# मृदूभाव जागे होता...

प्रिय वाचक दोस्तांनो,

'कहाणी दोन भावांची' च्या पाठोपाठ 'मृदूभाव जागे होता...' हा कथासंग्रह माझ्या वाचक मित्र-मैत्रिणींच्या हाती देताना खूप आनंद होतोय. दोस्तांनो, हे धाडस मी केलंय ते केवळ तुमच्या उदंड नि उत्स्फूर्त प्रतिसादामुळे !

आपण जनमतो, मोठे होतो, रमतो-फुलतो एक सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व बनतो ते आपल्या कुटुंबात, आपल्या अवती-भोवतीच्या समाजात. निरनिराळ्या नाजूक-रेशमी नातेसंबंधांमुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भावनाकोष समृद्ध बनतो. आपले आई-बाबा, आजी-आजोबा, बहीण-भावंडं, मामा-मावशी, आपले मित्र-मैत्रिणी, शेजारी-पाजारी... या साऱ्या नातेसंबंधांतील काही आंबट-गोड अनुभव आपल्याला बरंच काही शिकवत असतात. आपल्याला परिप व बनवत असतात. प्रसंगी आपल्या मनाचे कंगोरे घासून थोडे गुळगुळीतही केले जातात. या नातेसंबंधात नेहमीच काही सगळं सरळ सोपं नि 'स्मूऽऽथ' नसतं. कधी ताण-तणाव, कधी रागावणं-धुसफुसणं, कधी समज-गैरसमज, कधी प्रेम तर कधी असूया यांचे काटे रूपत असतात. तरीसुद्धा आंतरिक प्रेमाच्या झऱ्यामुळे, मायेच्या मंदशीतल झुळकीमुळे आपले 'मृदूभाव' आपसुक जागे होतात.... ते चिरंतन असतात. हे आजूबाजूचे काटे बाजूला करून या मृदूभावांची जोपासना करणं, नाजूक प्रेमस्पर्शानं त्यांना फुलवत ठेवणं ही प्रत्येकच नात्याची जबाबदारी असते, नाही का?

तुमच्या माझ्या अनुभवविश्वातील असे खट्टे-मीठे प्रसंग या विविध कथांतून तुम्हाला भेटतील. 'मृदूभाव' मधील खोडकर हिंसक केदार, आईवर रुसून अन्न सत्याग्रह करणारी आडनिड्या वयाची 'मी' नि छोट्या छोट्या गोष्टीत आईवडिलांशी संघर्ष करणारा अर्ध्या-कच्च्या वयाचा मोहित, सारखी केस विंचरणारी, आरशापुढे उभी रहाणारी नि

दहावीच्या परीक्षेचा बाऊ करणारी सायली; तर चार घरी कामं करून शिकणारी, अडचणीच्या प्रसंगी दहावीचा बाऊ न करता मदत करणारी संगीता, प्रेम आणि असूया, द्वेष यांच्या गुंतागुतीत अडकलेल्या दोन बहिणी दिदी नि मुन्नी.... ही सगळी आपलीच प्रतिबिंबं आहेत. नव्हे, आपणच आहोत ती सारी म्हणजे ! फुलाफुलांचे भडक कपडे घालणारा सखाराम नि उंची मोटरकार्समधून फिरणारे तथाकथित श्रीमंत यांच्यातील समज-गैरसमजावर अचूक बोट ठेवणारे सज्जन डॉ. भिंगे, मुलांशी मैत्रीपूर्ण जवळीक साधू शकणारी मावशी, बघा तुम्हाला आवडताहेत का ?...

किशोर-कुमारांनीच नाही तर त्यांच्या आई-बाबांनीही या कथासंग्रहाचे स्वागत केले तर मला अधिक आवडेल.

या पुस्तकाच्या निर्मितीत 'छात्र प्रबोधन'चे संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. आपल्या विविधरंगी कामाच्या पसाऱ्यातून त्यांनी यात जातीने लक्ष घातले नसते तर हे पुस्तक काढण्याचे धाडस मला करता आले नसते. चित्रकार गिरीश सहस्रबुद्धे यांनी बोल या चित्रांनी या कथांमध्ये खरं तर प्राणच ओतले आहेत. त्यांच्या चित्रांमुळे या कथांमधील पात्रांशी वाचकांना नक्कीच दोस्ती करावीशी वाटेल.

आणि माझी घरची मंडळी ! चि. प्रमोद, चि. प्रणव ही माझी मुले चि. सौ. अवनी ही लाडकी सून आणि त्यांचे बाबा या सर्वांच्या पाठिंब्याशिवाय मला खरं तर काहीच श य नाही.

तसेच माझ्या मैत्रिणी -- माधुरी टेंभेकर, सुजाता अवटी, मेरी फर्नांडिस, चारुता पुराणिक, अंजली नानल यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मला खूप बळ लाभलं.

या सर्वांचे आभार थोडेच मानायचे ? आम्हा सर्वांमधील मृदूभाव असेच चिरंतन राहोत, ही प्रार्थना करून थांबते ! आता उत्सुकता आहे ती तुमच्या प्रतिसादाची....

आपली

**सुहासिनी देशपांडे**

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मृदूभाव जागे होता..... | ६ |
| २. | मावशीचा विजय असो | १५ |
| ३. | माझा अन्न सत्याग्रह | २१ |
| ४. | जनरेशन गॅप | २७ |
| ५. | परिवर्तन | ३५ |
| ६. | दोघी | ४२ |
| ७. | लाल शर्ट निळा रुमाल | ५२ |


**वरील सर्व कथा - छात्र प्रबोधन मासिकामध्ये प्रकाशित झाल्या आहेत.**

## ज्ञान प्रबोधिनीची कथा - ललित - अनुभवपर प्रकाशने

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!**

**१. कथासंग्रह – दरवळ बहर, मृदगंध, मोहोर**
**किंमत – रु. ४०/– ५०/– ६०/– ६०/–**
(छात्र प्रबोधनच्या अंकातील निवडक उत्कृष्ट कुमार कथांचे संग्रह)

**२. आयुष्यातील वादळलाटा** ₹ ६०
(२१ कर्तृत्ववान ० तींच्या आयुष्यातील कसोटीचे प्रसंग)

**३. वाचलेच पाहिजे असे काही** ₹ २०
**भाग १ व भाग २ प्रत्येकी**
(२० वाचनीय पुस्तकांचा परिचय व ५० पुस्तकांची यादी)

**४. कहाणी दोन भावांची** ₹ २५
('वेटिंग फॉर मिरॅकल्स्' वॉल्ट डिस्ने यांच्या चित्रपटात भावानुवाद)

**५. कथा इस्त्रोची** ₹ ६०
(डॉ. वसंत गोवारीकर यांनी लिहिलेली
भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची प्रेरणादायी कहाणी)

**६. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** ₹ ५०
(ललित लेखन कसे करावे? याचा मूलमंत्र देणारे,
डॉ. अशोक निरफराके यांनी प्रयोग व अनुभवातून लिहिलेले पुस्तक)

**ज्ञान प्रबोधिनीची इतरही अनेक संग्राह्य प्रकाशने**

**संपर्क पत्ता**
**छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
☎ (०२०) २४२०७१ ७४ / ७५
**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org

आपण एक सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व बनतो ते आपल्या कुटुंबात
नि आपल्या अवती-भवतीच्या समाजात. निरनिराळ्या नातेसंबंधांमुळे
आपला भावनाकोष समृद्ध बनतो. आपले आई-बाबा,
बहीण-भावंडं, मित्र-मैत्रिणी, शेजारी-पाजारी...
या साऱ्या नातेसंबंधातील काही आंबटगोड अनुभव आपल्याला
बरंच काही शिकवत असतात. प्रसंगी आपल्या मनाचे कंगोरे घासून
थोडे गुळगुळीत केले जातात.
या नातेसंबंधात नेहमीच सगळं काही सरळ, सोपं नि स्मूऽऽथ नसतं.
कधी ताण-तणाव, कधी रागावणं-धुसफुसणं, कधी समज-गैरसमज,
कधी प्रेम तर कधी असूया यांचे काटे रूपत असतात. तरीसुद्धा
आंतरिक प्रेमाच्या झऱ्यामुळे, मायेच्या मंदशीतल झुळकीमुळे
आपले 'मृदूभाव आपसूक जागे होतात'... ते चिरंतन असतात.
तुमच्या माझ्या अनुभवविश्वातील अशा खट्ट्या-मीठ्या प्रसंगांच्या
**कथांचा हा संग्रह !** किशोर कुमारांबरोबरच त्यांच्या आई-बाबांना
आणि सर्वच मोठ्यांनाही हा कथासंग्रह नक्कीच आवडेल.

